# ।। अधीरजता को अंग ।।
## मारवाडी+ मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ अधीरजता को अंग लिखंते ।।

कन्या बेचे मोल कर ।। पइशा लेहे बजाय ।।
के परणे के ब्याज ले ।। वो धन खर्चे खाय ।।
वो धन खर्चे खाय ।। जके महा पापी होई ।।
मुख दीढारो पाप ।। बेद सायद में जोई ।।
सुखराम दास वे इक रंगा ।। ज्याहाँ त्याहाँ फूले आय ।।
किन्या बेचे मोलकर ।। पइसो लेहे बजाय ।।१।।

या मनुष्य प्राण्यासारखा अधीर कोणीच नाही,याच्याजवळ कितीही धन झाले,तरीही याला धैर्य येत नाही,दुसरे सर्व प्राणी एक वेळ आपले पोट भरुन गेल्यावर,दुसऱ्या वेळी पोट भरण्याची काळजी करीत नाही,दुसरे सर्व प्राणी फक्त एक वेळ पोट भरण्याकरीता अधीर राहतात,परंतु मनुष्य प्राण्याला कितीही होवून गेल्यावर धैर्य येत नाही,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हा मनुष्य प्राणी आपल्या मुलीला,जीला कन्यारत्न असे म्हणतात,अशा मुलीला किंमत ठरवून विकुन टाकतो आणि त्या मुलीचे ठोकून पैसे घेतो.त्या पैशाने परत तो लग्न करतो किंवा ते रुपये व्याजाने देतो,असे त्या मुलीला विकल्याने प्राप्त झालेल्या धनाला खर्च करतो आणि खातो.(मुलीला विकुन त्याचा पैसे घेणे,हे त्या मुलीचे मांस विकुन पैसे घेणे आहे,त्या मुलीला मांसा पासून आलेले पैसे खाणे म्हणजे,त्या मुलीचे मांस खाण्यासारखे आहे.त्या मुलीच्या मांसाचे आलेले पैसे आणि त्यापासून खरीदी केलेले अन्न घरचा किंवा कोणी बाहेरचा ही खाईल, तरीही त्या मुलीचे मांस खाण्यासारखे आहे,त्या पैशाने कोणी सामान खरीदी केला तर तो त्या मुलीचे मांसच आहे,कारण ही किंमत त्या मुलीच्या मांसाची होती.)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते मुलीचे मांस खाणारे महापापी आहे,इतके मोठे पाप दुसरे कोणतेच नाही आहे,दुसऱ्या पाप्यांचे तोंड बघीतल्याने पाप लागत नाही,परंतु मुलगी विकणाऱ्याचे तोंड बघीतल्याने पाप लागते,अशी वेदांमध्ये साक्ष आहे.यावर एक दृष्टांत:– (एक रजस्वला चांडाळीण,कुत्र्याचे शिजविलेले मांस डोक्यावर घेऊन रस्त्याने जात होती,ती रस्त्याने चालतांना पाणी शिंपडत जात होती,एका वाटसरुने तीला विचारले की,तुझ्याजवळ सर्व अमंगळ आहे,तूं चांडाळीण आहे,त्यात रजस्वाला आहे आणि डोक्यावर शिजविलेले कुत्र्याचे मांस,तूं पाणी शिंपडून काय शुद्ध करीत आहेस,तुझ्या पेक्षा अधिक दुसरे काय अशुध्द होवू शकते?असा तो वाटसरु बोलला,तेव्हां ती चांडाळीण बोलली की,कोणी कन्येचा पैसा घेणारा,या रस्त्याने गेला असेल,त्यामुळे हा रस्ता अशुद्ध गेला,तो माझ्यापेक्षा कईक पटीने अशुध्द आहे,याकरीता मी पाणी शिंपडून राहीली आहे.)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते एक रंगी दुसऱ्या

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सारखे,जेथे तेथे येऊन फुललेले राहतात,परंतु पुढे कोणत्या नर्कात जावे लागेल,हे त्यांना माहित नाही. ।।१।।

कवत्त ।।

लगी पेट की दाय ।। ओर सूझे नहिं काई ।।
तीन लोक नर नार ।। आपदा रहया संभाई ।।
सिध पीर अवतार ।। सरब माया सुं लागा ।।
ब्रम्हा बिस्न महेस ।। ईस लग ग्रभ न भागा ।।
माया बड़ी बलाय हे ।। काउ नहिं जीती जाय ।।
केईक जन सुखराम के ।। जीत गया जुग माय ।।२।।

अरे,यांना पोटाची आग लागली आहे,यांना दुसरे काहीही सुचत नाही,आपल्या पोटा करीता,आपल्या पोटची मुलगी विकून टाकतात,मुलगी विकली नसती,तर काय हे भुके राहीले असते,यांना इतकेही नाही समजले की,पोटाकरीता आपली मुलगी कशी विकू? पोटाकरीता असे काय हवं?दिवसभराकरीता अर्धा किलो अन्न.यांना दुसरे काहीही सुचत नाही,तिन्ही लोकांचे स्त्री–पुरुष संकट पकडून बसले आहेत,दुसरा कोणताही प्राणी, दुसऱ्या वेळेची चिंता करुन,संग्रह काही ही करीत नाही,परंतु मनुष्याजवळ कितीही असले तरीही,धैर्य येत नाही,मनुष्य प्राणी असा अधीर आहे.संसारातील चौऱ्याशी सिद्ध आणि चोवीस पीर तसेच दहा किंवा चोविस अवतार,हे सर्व मायेसी लागलेले आहेत,अधिक तर काय,ब्रह्मा,विष्णु,महादेव या तिघांना लोक ईश्वर म्हणतात,परंतु याचेंही भ्रम गेले नाही,ही माया खुप मोठी बला आहे,ही माया कोणाकडून ही जिंकली जात नाही,परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अनेक संत संसारातुन मायेला जिंकून मायेच्या पार गेले आहेत. ।।२।।

सवईयो इंद व छंद ।।

पैसो भयो जब टके की आसा ।। टके सें दोय टका मन भावे ।।
दोय सूं चार हुवा जब राजी ।। रिपिये ऊपर सुरत लगावे ।।
रिपियो आन मेले जब कोई ।। पाच पचीस की गाँठ जुं चावे ।।
पाँच ज्युँ पाँच पचीस हुवा ।। सेकड़ां ऊपर मन दौडावे ।।
सेंकडा पांच मिले कुछ जाफा ।। सेंस कूं छोड़ लाखा मन जावे ।।
लाख ज सात सताईस होई ।। अडबा खड़बा मन दोडावे ।।
अडबा खडबा होय लिला संख ।। असंखा माया जु चावे ।।
अे तो हु धन मिले तब आई ।। भूपज होनकी प्यास लगावे ।।
भूप से भूप होउ कुछ जाफा ।। दीन दुनिपे पातशा कुवाई ।।

पातशा होय रहे मन आगो ।। इन्द्रासन मे इंद्र हुँ जाई ।।
तोही यो मन रहे दिल आगो ।। ब्रम्हा जुं होनकी प्यास लगाई ।।
मन की भूख कहे सुखदेव जी ।। बिना संतोष मिटे नहि भाई ।।३।।

मनुष्या जवळ सर्व प्रथम एक पैसा आला,परत दोन पैशाची आशा करतो की,एक पैसा आणखी झाल्यावर,माझ्याजवळ पैशाची जोडी होऊन जाईल.दोन पैसे झाल्यावर,एक आणा व्हायला पाहिजे,असे मनांत येते आणि एक पैसा असल्यावर खुष होतो,परत रुपयाकडे लक्ष लावतो की,रुपया होवून जायला पाहिजे.परत रुपया झाल्यावर म्हणतो, पांच रुपये होवून गेले तर छान झाले असते.पांच रुपये झाल्यावर म्हणतो,पंचवीस झाल्यावर गासोडी बांधून ठेवून देईन,अशी इच्छा करतो.पंचवीस होवून गेले तर,परत शंभराच्यावर मन पळवतो आणि शंभर होवून गेल्यावर पांचशे,पांचशे झाल्यावर आणखीही काही जास्त व्हायला पाहिजे.नंतर हजाराला सोडून लाख झाल्यावर,सत्तावीस लाख व्हायला पाहिजे,मग अरबावर मन पळते,तरीही धैर्य काहीही येत नाही,परत खरब, शंख होवून गेल्यावर असंख्य माया चाहतो,परंतु धैर्य काही येत नाही,इतके धन मिळून गेल्यावर,मग राजा होण्याची तहान लागते,राजा झाल्यावर परत मोठा राजा व्हायला पाहिजे.मोठा राजा झाल्यावर मला दुनियेचा बादशहा म्हणायला पाहिजे,सर्व दुनियेचा बादशहा झाला,तरीही मन पुढेच जाते,मी इंद्रासन घेऊन इंद्र होऊन,तेहतीस कोटी देवतांचा राजा व्हायला पाहिजे,इंद्र झाल्यावर ही,हे मन पुढेच जाते की,मी ब्रह्मा व्हायला पाहिजे,अशी ब्रह्मा होण्याची तहान लागते,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या मनाची भुक संतोष शिवाय कोणा कडूनही मिटत नाही. ।।३।।

।। इति अधिरजता को अंग संपूरण ।।